ePaper
| वर्ष - 8 | अंक - 28 | UDYAM-MH-26-0158827 |
महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!
www.mahaenews.com | शुक्रवार, दिनांक 2 ऑगस्ट 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## बोपखेल येथे लोखंडी गेट अंगावर पडल्याने तीन वर्षीय चिमुकलीचा मृत्यू



### आतील पानांत

- पी.व्ही.सिंधूला पराभवाचा धक्का!
- कुसाळेने पटकावलं कांस्य पदक
- आमिरला आलेले मुलाचे टेन्शन!
- मागे राहिलेल्या समूहांना न्याय मिळणार?

## भाजपमध्ये राष्ट्रीय स्तरावरील सत्तास्पर्धा तीव्र

# फडणवीस भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष?

### दिल्लीच्या राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण

। पुणे । महाईन्यूज

**भाजपमध्ये राष्ट्रीय स्तरावरील सत्तास्पर्धा तीव्र झाल्याचे दिसू लागले असून राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या गळ्यात राष्ट्रीय अध्यक्षपदाची माळ पडणार असल्याची चर्चा गुरुवारी दिल्लीच्या राजकीय वर्तुळात रंगली. केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा यांची अध्यक्षपदाची मुदत संपुष्टात आली असली तरी नव्या अध्यक्षाबाबत पक्षाकडून अद्याप कोणतेही स्पष्ट संकेत देण्यात आलेले नाहीत.**



संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशनात वृत्तांकन करणाऱ्या हिंदी व इंग्रजी माध्यमांच्या प्रतिनिधींपैकी अनेकांनी गुरुवारी भाजप नेत्यांकडून संभाव्य अध्यक्षाचे नाव जाणून घेण्याचा प्रयत्न केला. या चर्चांमध्ये अन्य काही नावांबरोबरच फडणवीस यांचेही नाव प्रामुख्याने घेतले जात होते. फडणवीस यांना राष्ट्रीय राजकारण सक्रिय केले जाईल असे बोलले जात असले, तरी विधानसभेची निवडणूक असल्याने याबाबत तातडीने निर्णय घेतले जाण्याची शक्यता नाही. त्याऐवजी सध्या केंद्रीय मंत्र्यांपैकी एखाद्याची अध्यक्षपदी वर्णी लागू शकेल, असे मानले जात आहे. त्यासाठीही नोव्हेंबर-डिसेंबरपर्यंत वाट पाहावी लागण्याची शक्यता आहे. असे असले, तरी गुरुवारी फडणवीसांच्या संभाव्य नियुक्तीबाबत दिल्लीत जोरदार चर्चा सुरू होती.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचे चांगले सूत जुळले असून महायुतीच्या जागावाटपापासून निवडणूक रणनीतीपर्यंत अनेक निर्णय शहांशी थेट चर्चा करून घेतले जात आहेत. त्यासाठी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री अजित पवार सातत्याने दिल्लीचे दौरे करत आहेत. महायुतीत तीन प्रमुख नेत्यांपैकी दोन नेते थेट शहांशी संपर्क साधत असल्याने फडणवीस यांच्याकडे निर्णय घेण्याचे अधिकार उरले नसल्याचे मानले जात आहे. त्यामुळे फडणवीस यांना विधानसभा निवडणुकीपूर्वीच दिल्लीत स्थलांतरित होण्यास सांगितले जाईल आणि त्यांच्याकडे भाजपचे राष्ट्रीय अध्यक्षपदाची जबाबदारी दिली जाईल अशीही एक चर्चा आहे.

उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनाही मुख्यमंत्रीपदावरून हटवले जाणार असल्याचा दावा केला जात होता. त्याचप्रमाणे आता फडणवीस यांना पक्षाध्यक्ष केले जाणार असल्याचे वृत्त दिल्लीच्या वर्तुळात फिरवले जात असल्याचे मानले जात आहे.

### चर्चेतील अन्य नावे

फडणवीस यांच्याबरोबरच केंद्रीय मंत्री शिवराजसिंह चौहान, मनोहरलाल खट्टर, धर्मेंद्र प्रधान, भूपेंद्र यादव यांच्या नावांचाही अध्यक्षपदासाठी विचार केला जाऊ शकतो. चौहान यांना पक्ष व प्रशासनाचा मोठा अनुभव असून भाजपमध्ये त्यांना आदराचे स्थान आहे. खट्टर मोदींच्या अधिक जवळचे मानले जातात. फडणवीस यांचेही मोदींशी अधिक सलोख्याचे संबंध असल्याचे बोलले जाते, तर प्रधान व यादव हे दोघे शहांचे निकटवर्तीय मानले जातात.

## देहूरोड ते चांदणी चौकापर्यंतची कोंडी फूटणार!

### नवीन डीपीआर मंत्रीमंडळासमोर; खासदार श्रीरंग बारणे यांची माहिती

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

पुणे-मुंबई राष्ट्रीय महामार्गावरील देहूरोड ते चांदणी चौकापर्यंतच्या रस्त्याच्या कामाचा नवीन डीपीआर तयार झाला आहे. त्याबाबतचा प्रस्ताव मंत्रीमंडळासमोर असून त्याला मान्यता देण्याची मागणी शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी केली. त्यावर केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांनी लवकरच मान्यता



दिली देण्याची ग्वाही दिल्याचे बारणे यांनी सांगितले. खासदार बारणे यांनी दिल्लीत केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेतली. महामार्गावरील वाकड, ताथवडे येथील वाहतुकीची समस्या त्यांना सांगितली. रस्त्याचे काम करण्याची मंत्रालयाची संपूर्ण तयारी आहे. परंतु, या रस्ते कामाचा जुना ठेकेदार सर्वोच्च न्यायालयात गेला आहे. त्यामुळे रस्त्याला विलंब होत असल्याचे गडकरी यांनी सांगितले. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 4 मावळ लोकसभा मतदारसंघातून जात आहे. देहूरोड, रावेत, पुनावळे, ताथवडे आणि वाकड येथील अंडरपास व ओव्हर ब्रीजची उंची आणि रुंदी कमी आहे. त्यामुळे तिथे वाहतूक कोंडी होते. वाहतुकीची ही समस्या सोडविण्यासाठी राष्ट्रीय महामार्गाचा सुधारीत डिटेल प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करण्याची मागणी अनेक दिवसांपासून करण्यात येत होती. त्यासाठी सातत्याने

### रस्त्याचा सुधारीत डीपीआर

अनेक ठिकाणी अर्धवट काम आहे. देहूरोड आणि वाकड पर्यंतचे क्षेत्र पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या हद्दीत येत आहे. वाकड ते चांदणी चौकापर्यंतचे क्षेत्र पुणे महापालिका हद्दीत आहे. या राष्ट्रीय महामार्गावर देहूरोड ते चांदणी चौक (पुणे) दरम्यान 12 अंडरपास आणि उड्डाणपूल आहेत. त्यामुळे तिथे वाहतूक कोंडी होते. ती सोडविण्यासाठी या रस्त्याचा सुधारीत डीपीआर बनविण्यात आला आहे.

# पूजा खेडकर यांना मोठा धक्का!

## अटकपूर्व जामीन फेटाळला; खेडकर यांना अटक होणार?

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**गेल्या महिन्याभरापासून महाराष्ट्रात चर्चेत आलेल्या माजी सनदी अधिकारी पूजा खेडकर यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. खेडकर यांच्यावर दिल्ली पोलिसांनी दाखल केलेल्या गुन्ह्यासंदर्भात त्यांनी पतियाला कोर्टात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला होता.**





पण हा अर्ज आज न्यायालयाने फेटाळला आहे. त्यामुळे आता दिल्ली पोलिसांकडून पूजा खेडकर यांच्या अटकेची कारवाई होण्याची शक्यता आहे. दरम्यान, पूजा खेडकर या निकालाविरोधात पुन्हा वरच्या कोर्टात अपील करणार की नाही? याविषयी निश्चित माहिती अद्याप समोर आलेली नाही.पूजा खेडकर यांच्याविरोधात दिल्ली पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांनी वडिलांची कोट्यवधींची मालमत्ता असूनही क्रिमीलेअर सुविधेचा लाभ घेऊन ओबीसी कोट्यातून अर्ज केल्याचा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे. त्याशिवाय, बेकायदेशीरपणे दिव्यांग असल्याची चुकीची कागदपत्रे सादर केल्याचाही आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला असून त्यासंदर्भात UPSC व लाल बहादूर शास्त्री अकादमीकडून तपास केला जात आहे. या पार्श्वभूमीवर दिल्ली पोलिसांच्या कारवाईपासून संरक्षण मिळण्यासाठी पूजा खेडकर यांनी अटकपूर्व जामिनासाठी अर्ज दाखल केला होता. त्यावर दिल्लीच्या पतियाला कोर्टामध्ये सविस्तर सुनावणी पार पडली. दरम्यान, बुधवारी पतियाला कोर्टात झालेल्या सुनावणीत दिल्ली पोलीस, UPSC व स्वत: पूजा खेडकर यांच्यावतीने सविस्तर युक्तिवाद करण्यात आला. "जिल्हाधिकाऱ्यांवर लैंगिक शोषणाचे आरोप केले म्हणून आपल्याला लक्ष्य केलं जात आहे", असा दावा पूजा खेडकर यांच्यावतीने करण्यात आला. तसेच, सर्व आरोप फेटाळण्यात आले. त्याचवेळी दिल्ली पोलिसांनी पूजा खेडकर यांच्याकडून खोटी कागदपत्रे सादर केल्याचा युक्तिवाद केला. तर यूपीएससीनं पूजा खेडकर यांनी फक्त आम्हालाच नाही, तर संपूर्ण समाजाला फसवलं आहे, असं म्हणत त्यांच्या अटकेची मागणी केली. बुधवारी पूजा खेडकर प्रकरणाची सविस्तर सुनावणी झाल्यानंतर गुरुवारी संध्याकाळी पतियाला न्यायालयाने यासंदर्भातला निकाल दिला. त्यानुसार पूजा खेडकर यांचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळण्यात येत असल्याचं न्यायालयानं नमूद केलं. "UPSC मधील आणखी कुणी पूजा खेडकर यांना या सगळ्या प्रकारात मदत केली आहे का? याचीही चौकशी दिल्ली पोलिसांनी करावी", असे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. त्याचबरोबर, "पूजा खेडकर यांच्याव्यतिरिक्त इतर असे कोणते उमेदवार आहेत का ज्यांनी निकषांत बसत नसतानाही क्रिमीलेअर सुविधेचा लाभ घेऊन ओबीसी कोट्यातून अर्ज केला होता किंवा दिव्यांगत्वासाठीचे पात्रता निकष ओलांडले होते याचा तपास यूपीएससीनं करावा", असे आदेश यावेळी न्यायालयाने दिले. पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात गैरवर्तन केल्याचा ठपका पूजा खेडकर यांच्यावर आधी ठेवण्यात आला.सनदी सेवेत निवड होताना त्यांच्या दिव्यांगत्वाबाबत चुकीची कागदपत्रे सादर केल्याचाही आरोप करण्यात आला.

### काय आदेश दिले न्यायालयाने?

पूजा खेडकर यांचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळण्यात येत असल्याचं न्यायालयानं नमूद केलं. "UPSC मधील आणखी कुणी पूजा खेडकर यांना या सगळ्या प्रकारात मदत केली आहे का? याचीही चौकशी दिल्ली पोलिसांनी करावी", असे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. त्याचबरोबर,"पूजा खेडकर यांच्याव्यतिरिक्त इतर असे कोणते उमेदवार आहेत का ज्यांनी निकषांत बसत नसतानाही क्रिमीलेअर सुविधेचा लाभ घेऊन ओबीसी कोट्यातून अर्ज केला होता किंवा दिव्यांगत्वासाठीचे पात्रता निकष ओलांडले होते.

# पोर्शे अपघात : जलदगती न्यायालयात चालवावे

## पोलीस आयुक्त अमितेश कुमारांची न्यायालयाकडे मागणी

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कल्याणीनगर येथील पोर्शे अपघात प्रकरणातील खटले जलदगती न्यायालयात चालविण्यात यावेत, अशी मागणी न्यायालयाकडे करण्यात येणार असल्याची माहिती पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी गुरुवारी दिली.**



पोर्शे अपघात प्रकरणात येरवडा पोलीस ठाण्यात अपघाताच्या मूळ गुन्ह्यासह अल्पवयीन मुलाच्या रक्ताचे नमुने बदलून पुरावे नष्ट करणे आणि चालकावर दबाव आणून खोटा जबाब द्यायला लावणे, त्याला डांबून ठेवणे, याप्रकरणी अन्य दोन गुन्हे दाखल आहेत. त्यापैकी पोर्शे मोटारचालक अल्पवयीन मुलाच्या रक्ताचे नमुने बदलून पुरावे नष्ट केल्याप्रकरणी सात आरोपींविरोधात न्यायालयात ९०० पानांचे आरोपपत्र नुकतेच दाखल करण्यात आले आहे. तब्बल पन्नास साक्षीदारांचे जबाब, सीसीटीव्ही चित्रीकरणासह आरोपींच्या मोबाइलचे विश्लेषण, प्रादेशिक न्यायवैद्यक विज्ञान प्रयोगशाळेचा अहवाल इत्यादी महत्त्वपूर्ण पुरावे या आरोपपत्रातून पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने न्यायालयात सादर केले आहेत. पोर्शे अपघात प्रकरणात येरवडा पोलीस ठाण्यात अपघाताच्या मूळ गुन्ह्यासह अल्पवयीन मुलाच्या रक्ताचे नमुने बदलून पुरावे नष्ट करणे आणि चालकावर दबाव आणून खोटा जबाब द्यायला लावणे, त्याला डांबून ठेवणे, याप्रकरणी अन्य दोन गुन्हे दाखल आहेत.

### आरोपींविरोधात 900 पानांचे आरोपपत्र

कल्याणीनगर येथील पोर्शे अपघात प्रकरणातील खटले जलदगती न्यायालयात चालविण्यात यावेत, अशी मागणी न्यायालयाकडे करण्यात येणार असल्याची माहिती पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी गुरुवारी दिली. त्यापैकी पोर्शे मोटारचालक अल्पवयीन मुलाच्या रक्ताचे नमुने बदलून पुरावे नष्ट केल्याप्रकरणी सात आरोपींविरोधात न्यायालयात ९०० पानांचे आरोपपत्र नुकतेच दाखल करण्यात आले आहे. तब्बल पन्नास साक्षीदारांचे जबाब, सीसीटीव्ही चित्रीकरणासह आरोपींच्या मोबाइलचे विश्लेषण, प्रादेशिक न्यायवैद्यक विज्ञान प्रयोगशाळेचा अहवाल इत्यादी महत्त्वपूर्ण पुरावे या आरोपपत्रातून पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने न्यायालयात सादर केले आहेत.

## पिंपरी-चिंचवड राष्ट्रवादीच्या अध्यक्षपदाचा तिढा कायम

# शहराध्यक्षाची धुरा कोणाच्या खांद्यावर?

### अजित पवार यांच्याकडून शनिवारपर्यंत शहराध्यक्षाचे नाव जाहीर केले जाण्याची शक्यता

**। पिंपरी। प्रतिनिधी : महाईन्यूज**

**पिंपरी-चिंचवड या अजित पवार यांच्या एकेकाळच्या बालेकिल्ल्यात राष्ट्रवादीचा शहर अध्यक्षपदी कोणाची नियुक्ती करायची याचा तिढा गेल्या १५ दिवसांत सुटू शकलेला नाही. शहराध्यक्षपदासाठी प्रबळ दावेदार मानले जात असलेल्यांना मात्र आमदारकीचे वेध लागले आहेत. त्यामुळे शहराध्यक्षाची धुरा कोणाच्या खांद्यावर द्यायची, असा प्रश्न निर्माण झाला आहे.**




विधानसभा निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक असलेल्या अजित गव्हाणे यांनी भोसरी मतदारसंघ महायुतीत भाजपला सुटेल असे गृहीत धरून १६ जुलै रोजी राष्ट्रवादीच्या शहराध्यक्षपदाचा राजीनामा दिला. त्याच्या दुसऱ्याच दिवशी त्यांनी समर्थक माजी नगरसेवकांसह राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला. शहराध्यक्षानेच पक्ष सोडल्याने कार्यकर्त्यांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली. आणखी पडझड होऊ नये यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी तत्काळ पक्षाचे पदाधिकारी, माजी नगरसेवकांची पुण्यात बैठक घेतली. शरद पवारांच्या मेळाव्यानंतर दुसऱ्याच दिवशी शहरात येत कार्यकर्त्यांचा मेळावाही घेतला. शहराध्यक्ष गव्हाणे एकटेच राजीनामा देऊन दुसऱ्या पक्षात गेले. महिला, युवक आघाडी, विविध सेलचे पदाधिकारी पक्षासोबतच असून, अध्यक्षपदासाठी काही नावे आली आहेत. त्यांपैकी कोणाला अध्यक्ष करायचे याची चाचपणी करत असून, लवकरच अध्यक्षाची नियुक्ती केली जाईल, असे पवार यांनी सांगून दहा दिवस झाले. परंतु, अद्याप शहराध्यक्षाची नियुक्ती झालेली नाही.शहराध्यक्षपदासाठी पिंपरीचे आमदार अण्णा बनसोडे, माजी महापौर योगेश बहल, जगदीश शेट्टी, नाना काटे, भाऊसाहेब भोईर, श्याम लांडे यांची नावे स्थानिक पदाधिकाऱ्यांनी सुचविल्याचे सांगितले जाते. त्यांपैकी बनसोडे विधानसभा लढणार असून, बहल यांना राज्यपालनियुक्त आमदारकी देण्याची मागणी आहे. तर, काटे, भोईर हे चिंचवडमधून निवडणूक लढण्यावर ठाम असल्याचे सांगितले जाते. महायुतीत चिंचवड मतदारसंघ भाजपकडे कायम राहण्याची शक्यता आहे. दुसऱ्या पक्षाकडून निवडणूक लढविण्याची वेळ आली, तर दोन महिन्यांसाठी शहराध्यक्षपद कशाला घ्यायचे, अशी त्यांची भूमिका असल्याचे समजते.

> “शहराध्यक्षपदासाठी काही नावे सुचविली आहेत. अजित पवार यांच्याकडून शनिवारपर्यंत शहराध्यक्षाचे नाव जाहीर केले जाईल, अशी अपेक्षा आहे.
>
> **–योगेश बहल,** ज्येष्ठ नेते, राष्ट्रवादी काँग्रेस

---

## अनुराग ठाकूर, सांबित पात्रा यांनी देशाची माफी मागावी!

### काँग्रेसचे शहर अध्यक्ष डॉ. कैलास कदम यांची मागणी




**। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज**

**संसदेचे विरोधी पक्षनेते खासदार राहुल गांधी यांच्या बाबत खासदार अनुराग ठाकूर आणि सांबित पात्रा यांनी अनुद्गार काढले त्याच्या पिंपरी चिंचवड शहर जिल्हा काँग्रेसच्या वतीने तीव्र निषेध करीत आहोत. खा. ठाकूर आणि पात्रा यांनी याविषयी देशाची माफी मागावी अशी मागणी शहर काँग्रेसचे शहर अध्यक्ष डॉ. कैलास कदम यांनी पिंपरी येथे केली.**

डॉ. कदम यांच्या नेतृत्वाखाली पिंपरीतील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा चौकात गुरुवारी सायंकाळी निषेध आंदोलन करण्यात आले. यावेळी उपस्थित कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी ठाकूर आणि पात्रा तसेच भाजप सरकारच्या विरोधी घोषणा देऊन निषेध व्यक्त केला.

डॉ. कदम निषेध व्यक्त करताना म्हणाले की, ठाकूर यांच्या तोंडून मनुवादी आणि जातीयवादी शब्द बाहेर पडले आहेत. जाती धर्मात द्वेष निर्माण करून देशात अस्थिरता निर्माण करून छुपा अजेंडा राबविण्याचे भाजपचे धोरण आहे. यावेळी भाऊसाहेब मुकुटमल, विश्वनाथ जगताप, विठ्ठल शिंदे, अशोक काळभोर, मेहबूब शेख, वाहब शेख, मकरध्वज यादव, मयूर जयस्वाल, शहाबुद्दीन शेख, प्रा. किरण खाजेकर, ॲड. अशोक धायगुडे, अमर नाणेकर, अक्षय शहरकर, बाबा बनसोडे, गणेश गरड, सोमनाथ शेळके, जॉर्ज मॅथ्यू, वसंत वावरे, अर्चना राऊत, ॲड. अनिकेत राऊत, ॲड. मोहन अडसूळ, भारती घाग, सुनिता जाधव, सुवर्णा कदम, शितल सिकंदर, बबीता ससाणे, गणेश बनपट्टे, अमित मोरे, राहुल शिंपले, सतीश भोसले, गणेश शेलार, मिलिंद फडतरे, बसवराज शेट्टी आदी उपस्थित होते.

## वाकड परिसरातील रस्त्यांची आठ दिवसांत दुरुस्ती करा!

### तीव्र आंदोलन करण्याचा विशाल वाकडकर यांचा इशारा

**। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज**





**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत समाविष्ट असलेल्या वाकड आणि परिसरातील रस्त्यांची अतिशय दयनीय अवस्था झाली असून रस्त्यांवर सर्वत्र खड्ड्यांचे साम्राज्य पसरले आहे. सर्वच प्रमुख रस्ते उखडले गेले असून नागरिक, वाहनचालक यांना त्याचा तीव्र त्रास सहन करावा लागत आहे. पुढील आठ दिवसांत रस्ते दुरुस्ती करण्यात यावी, अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवा नेते विशाल वाकडकर यांनी दिला आहे..**

याबाबत विशाल वाकडकर यांनी दिलेल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे की, वाकड आणि परिसरातील सर्वच प्रमुख रस्त्यांची दुरवस्था झालेली आहे. यामध्ये भूमकर चौक ते हिंजवडी हा प्रमुख रस्ता यावर भूमकर चौक येथे मोठ्या प्रमाणत खड्डे पडले आहेत. कस्तुरी चौक ते विनोदे नगर या रस्त्याची अक्षरशः चाळण झाली आहे. काही ठिकाणी चेंबरचे झाकणही नाहीत. तसेच विनोदेनगर येथील प्रमुख रस्ता अवघ्या दीड महिन्यात उखडला आहे. तसेच आल्हाट वस्ती कडे जाणारा इन्सिग्निया सोसायटी जवळील रस्ता अत्यंत दुरवस्थेत आहे सर्वत्र खड्डे आणि चिखल तुडवत नागरिकांना जावे लागत आहे. वाकड दत्तमंदिर रस्त्याचे काम गेल्या अनेक दिवसांपासून अतिशय संथ गतीने चालू असून ठेकेदाराच्या मर्जीप्रमाणे काम चालू आहे. याचा सर्वसामान्य नागरिक आणि वाहनचालक व्यावसायिक विक्रेते यांना प्रचंड मोठा त्रास सहन करावा लागत आहे. त्याचबरोबर भुजबळ चौक वाकड येथील हॉटेल राजयोग समोरील सर्व्हिस रस्ता हा पूर्णतः खड्डेमय झाला आहे. सर्वत्र खड्डे पडले असून काही ठिकाणी चेंबरचे झाकण ही नाहीत उघडे चेंबर अपघातास निमंत्रण ठरत आहेत.

तरीही अशा परिस्थितीतून मार्ग काढत वाहन चालकांना प्रवास करावा लागत आहे. रस्त्यांवरील खड्डे आणि वाढती वाहतूककोंडी यामुळे नागरिकांचे हाल होत आहेत. उद्योग नगरी असा बिरूद मिरवणारी पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरिकांना उत्तम प्रतीचे रस्तेही देऊ शकत नाही याबाबत नागरिकांमधून चीड व्यक्त केली जात आहे.



## भूमिका

# ‘लोकमान्य’ फक्त ब्राह्मणांचेच नव्हते!

**भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे कौस्तुभमणी म्हणजे लोकमान्य टिळक. ब्रिटिश साम्राज्याला हादरवून सोडणाऱ्या स्वातंत्र्य लढ्याबरोबरच त्यांनी अनेक लोकसाह्य चळवळी सुरू केल्या.**

पैसाफंड, राष्ट्रीय शिक्षण, दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी जागरूकता, सोलापूरच्या विणकर, साळी व कोष्टी समाजासाठी पाठिंबा व मदत, गिरणी कामगारांच्या हक्कासाठी लढा, इतकेच काय पण १९०० साली प्लेगमध्ये नागरिकांच्या अडचणींसंदर्भातील सभेत नायकिणींची बाजू त्यांनी समर्थपणे मांडली. १८९५ साली पुण्यात भरणाऱ्या काँग्रेस अधिवेशनाला सर्व व्यवसाय करणारे तेली, तांबोळी, कामगार, हमाल आदींना सभासद म्हणून नोंदवले जावे यावर टिळकांचा आग्रह होता. ते शेतकऱ्यांचे, कोळ्यांचे, गिरणी कामगारांचे नेते होते. या चळवळींबरोबरच अर्थात शिवजयंती उत्सव आणि सार्वजनिक गणेशोत्सव विसरता येणार नाही.समाजातील सर्व घटकांना एकत्र घेऊन ब्रिटिश साम्राज्याला सामोरे जाणे हे त्यांचे तत्त्व होते. पण सध्या सोयीचेच राजकारण चालू असल्याने प्रत्येक जण टिळक हा विषयसुद्धा जातीजमातीच्या भिंती उभ्या करण्यासाठीच वापरतो आहे. वास्तविक लोकमान्यांनी जसे ब्रिटिश सरकारला धारेवर धरले



तद्वतच पुण्यातील सुशिक्षित ब्राह्मणांवर ताशेरे ओढण्याचे त्यांनी कमी केले नाही. ०६ जुलै१८९७ च्या ‘केसरी’ मधील प्रसिद्ध अग्रलेखात (‘सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय?’) ते म्हणतात – ‘पुण्यातील पाच-पंचवीस ब्राह्मणदेखील एखादे चांगले काम एकजुटीने करतील, अशी आमची स्थिती नाही. मग खुनासारख्या (रँड हत्या) भयंकर गुन्ह्यासंबंधाने तर बोलावयासच नको’. २०जुलै१८९७ च्या ‘केसरी’मधील अग्रलेखात (‘राजद्रोह कशाला म्हणतात?’) ते लिहितात – ‘पिंपळाच्या मुळ्यांनी शतधा विदीर्ण झालेल्या जुन्या पाराप्रमाणे पुण्याच्या ब्राह्मणांची सध्या स्थिती झाली आहे’. आधुनिक समाजातील ब्राह्मणवर्गाने कसे कार्य करावे याबद्दल टिळक म्हणतात – ‘ब्राह्मणांनी लोकशिक्षणासाठी मिशनरी लोकांप्रमाणे काम करायला हवे’. या संदर्भात ते ‘ग्रॅजुएट रामदासी’ असा शब्दप्रयोग करतात.दिनांक १४ सप्टेंबर१९०७ रोजी पुण्यात गायकवाडवाड्यात सार्वजनीक गणेशोत्सवात झालेल्या सभेत टिळक म्हणतात – ‘राष्ट्रीय शिक्षण केवळ ब्राह्मणांकरिताच नको आहे. चांभार, लोहार, शेतकरी, सोनार या अठरापगड जातीसह सर्व धर्मांच्या सर्वांनाच राष्ट्रीय शिक्षण दिले गेले पाहिजे. सर फिरोजशाह मेहता म्हणतात, सरकारी शाळेतूनच आम्ही निघालो; तसेच आणखीही लोक निघतील. रानडे, मेहता हे न्यू इंग्लिश स्कूलच्या शिक्षणातून निघाले. पण फार झाले तर शेकडा एके-दोन निघाले. आम्हाला शेकडा शंभर पाहिजे आहेत, हे कसे निघणार? सर्वांवर राष्ट्रीय विचारांचा ठसा उमटला पाहिजे आणि ते राष्ट्रीय शाळांवाचून होणार नाही.’लोकमान्य टिळकांनी, समर्थ विद्यालयात राष्ट्रीय शिक्षणावर दिलेल्या भाषणात, ते म्हणतात – जातीभेद, जातीद्वेष, व जातीमत्सर यांच्या योगाने आपला देश कसा विभागला जात आहे, कसा भाजून निघत आहे, कसा करपून जात आहे, याचेही ज्ञान राष्ट्रीय शाळेतील मुलांना मिळाले पाहिजे. जातिभेद मोडण्याची आवश्यकता किती आहे, हे आमच्या विद्यार्थ्यांना समजले पाहिजे. जातीजातीचे तंटे न होऊ देण्याची खबरदारी घेणे हे सर्वांचे आद्य कर्तव्य आहे, ही गोष्ट राष्ट्रीय शाळेतील विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवण्यात आली पाहिजे. प्रस्तुत परिस्थिती लक्षात घेऊन राष्ट्रीय विद्यालयात सर्व धर्मांच्या विद्यार्थ्यांच्या धर्मशिक्षणाची सोय झाली पाहिजे’टिळकांचे, ‘होमरूल लीग’च्या प्रचारासाठी पहिले भाषण ३१ मे१९१६ रोजी झाले. या भाषणात टिळकांनी ‘परके’ या शब्दाची अत्यंत महत्त्वपूर्ण व्याख्या केली. परके म्हणजे केवळ धर्माने परके लोक आपल्याला अभिप्रेत नाहीत, असे ते म्हणतात. ‘मुसलमान असो व इंग्रज – त्याने या देशातील लोकांचे भले केले, तर तो परका नाही. परकेपणा धर्माशी, जातीशी, व्यापाराशी व पेशाशी निगडित नाही; हा प्रश्न हितसंबंधांचा आहे... एखादा माणूस भारताच्या हितासाठी कष्ट करत असेल आणि त्या दिशेने उपाय योजत असेल, तर मी त्याला परका मानणार नाही; पण सध्याचे सरकार तसे करत नाही.

## संपादकीय »

# निकालाच्या मर्यादा!

***साम्य/भेद या मुद्द्यांच्या पलीकडे, प्रत्यक्ष व्यवहारात या निकालाचे परिणाम काय होणार याबद्दलही स्पष्टता आवश्यक आहे...***

खंडपीठाने ८-१ अशा बहुमताने दिलेला निकाल सर्वार्थाने दूरगामी आहे. यातील मुद्दे केवळ आर्थिक नाहीत. केंद्र-राज्य संबंधांपासून ते कर आकारणीबाबत राज्यांची स्वायत्तता ते पर्यावरण आणि राज्या-राज्यांतील स्पर्धा अशा अनेक मुद्द्यांवर या निर्णयाचा परिणाम होणार असून हा निर्णय जर पूर्वलक्ष्यी प्रभावाने अमलात आला तर आर्थिक आणि राजकीय आघाडीवर हलकल्लोळ माजेल यात शंका नाही. या विषयाची व्याप्ती लक्षात घेता जे झाले ते राज्यघटनेची कलमे आदी तांत्रिक मुद्दे दूर ठेवून समजून घेणे आवश्यक ठरते. सुमारे पाव शतकभर न्यायप्रविष्ट असलेले हे प्रकरण म्हणजे ‘मिनरल एरिया डेव्हलपमेंट ऑथॉरिटी विरुद्ध स्टील ऑथॉरिटी ऑफ इंडिया’ यांच्यातील खटला. त्यात पुढे झारखंड, प. बंगाल, ओडिशा, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, गोवा, कर्नाटक ही राज्ये आणि प्रत्यक्ष केंद्र सरकार उतरले. यावरून हे प्रकरण सर्वपक्षीय आहे हे लक्षात येईल. ही सर्व राज्ये खनिजसंपन्न आहेत.

चांगल्या शिक्षणामुळे प्रत्येक इयत्तेत बुद्ध्यांक १ ते ५ गुणांनी वाढू शकतो. एखाद्या मुलाला त्याला शक्य असलेल्या बुद्ध्यांकापर्यंत पोहोचवण्यात अपयशी ठरणारा समाज, त्या मुलाची बौद्धिक उपासमार करत असतो. यावर प्रभावी ठरू शकेल, मूलभूत शिक्षणाचा दर्जा सुधारणे.

# बौद्धिक उपासमार आणखी किती काळ?

भारतातील आर्थिकदृष्ट्या तळातील ५० टक्के जनतेला काय हवे आहे? फुकट धान्य, शिक्षणात वा नोकऱ्यांमध्ये आरक्षण, फुकट वा सवलतीत घरे, विमानतळ, बोगदे, महामार्ग, मंदिरे? हे सर्व देणे शक्य आहे का आणि देणे योग्य आहे का याबद्दल थोडाफार ऊहापोह होऊ लागला आहे. पण एक महत्त्वाची गोष्ट चर्चेत येत नाही, ती म्हणजे सामान्य जनतेला मिळणाऱ्या शिक्षणाची गुणवत्ता.‘असर’ या संस्थेने वर्षानुवर्षे केलेल्या सर्वेक्षणांतून चिंताजनक स्थिती समोर येते. या वर्षीच्या सर्वेक्षणातील काही निरीक्षणे: १४-१८ वयोगटातील २५ टक्के मुला-मुलींना दुसरीचे पुस्तक वाचता येत नाही. ५० टक्के मुलांना तीन आकडी संख्येला एक आकडी संख्येने भागात येत नाही. साहजिकच या मुलांना सरकारी नियम वाचता येणार नाहीत. वस्तू कशा वापरायच्या याविषयीच्या सूचना वाचता येणार नाहीत, आर्थिक व्यवहारांतली आकडेमोड करता येणार नाही. नवे



काहीही शिकताना त्यांना अडचणी येतील आणि आत्मविश्वास खचेल. औपचारिकदृष्ट्या प्राथमिक शिक्षण सर्वांपर्यंत पोहोचले असले तरी उच्च शिक्षण, नोकरी मिळणे आणि दैनंदिन व्यवहार, यांत खूप अडचणी येतील अशी भीती आहे. नोकऱ्यांच्या बाबतीत हे स्पष्ट दिसते. अत्युच्च पदव्या प्राप्त केलेल्या अनेक उमेदवारांना नोकऱ्या मिळत नाहीत, आणि त्याच वेळी रिक्त जागा भरण्यासाठी पात्र उमेदवार मिळत नाहीत, अशी विचित्र स्थिती आपल्यासमोर आहे. माहीत बरेच काही आहे पण त्या माहितीचा उपयोग करता येत नाही, ही आपल्या नव्या पिढीची शोकांतिका आहे.अशीच तक्रार उच्च शिक्षणातील प्राध्यापकांची सुद्धा आहे. आधीच्या वर्गातील अभ्यासक्रमच नीट येत नाही, समजलेला नाही, तर नवे काही शिकवणार तरी कसे, असा प्रश्न त्यांच्यासमोर आहे. अशा परिस्थितीत पात्रता नसलेल्या विद्यार्थ्यांना उत्तीर्ण करणे, पदव्या देणे याचा दबाव येतो. महत्त्वाची कौशल्ये (‘असर’च्या अहवालात नमूद केल्याप्रमाणे) अवगत नसताना उत्तीर्ण होणे हा प्रकार शाळेपासून सुरू होतो, ही स्थिती आपल्या परिचयाची असेलच. शिक्षणाची गुणवत्ता चांगली नसण्याचा त्रास समाजातल्या दुर्बल घटकांना अधिक होतो. वरच्या स्तरांतील लोक जास्त पैसे खर्च करून खास शाळा वा खासगी शिकवण्यांची तरतूद करू शकतात. ही चैन दुर्बल घटकांना परवडण्यासारखी नसते. यामुळे असे होऊ शकते की आरक्षणामुळे विद्यार्थी पुढे जातात तर खरे, पण त्यांना मिळणारे शिक्षण झेपत नाही, कारण त्यांची प्राथमिक कौशल्येच (गणित आणि भाषा व चिकित्सक विचार प्रक्रिया) विकसित झालेली नसतात.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# दाढीवाले बाबा वरती बसलेत!

## गुलाबराव पाटलांचं कार्यकर्त्यांशी बोलताना मिश्किल वक्तव्य

। मुंबई ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**विधानसभेची निवडणूक पुढच्या दोन ते तीन महिन्यांमध्ये जाहीर होण्याची शक्यता आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्ष तयारीला लागले आहेत. सध्या राजकीय नेते आपल्या मतदारसंघाचा दौरा करत कामाचा आढावा घेत आहेत. तसेच विविध ठिकाणी मेळावे, सभा, आणि आढावा बैठका घेत कार्यकर्त्यांना महत्वाच्या सूचना देत आगामी निवडणुकीबाबत रणनीती आखत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. विधानसभेच्या निवडणुकीत राज्यात प्रामुख्याने महाविकास आघाडी विरुद्ध महायुती असा सामना रंगण्याची चिन्ह आहेत.**



महायुती आणि महाविकास आघाडीत असणाऱ्या पक्षांमध्ये विधानसभेच्या जागावाटपाबाबतही सध्या खलबतं सुरु आहेत. अशातच निवडणुकीच्या आधी राजकीय नेत्यांमध्ये आरोप-प्रत्यारोपही पाहायला मिळत आहेत. आता शिवसेना शिंदे गटाचे नेते, मंत्री गुलाबराव पाटील यांनी कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात बोलताना केलेल्या एका वक्तव्याची चर्चा रंगली आहे. "दाढीवाले बाबा वरती बसलेत, तुम्ही या दाढीवाल्या बाबाकडे लक्ष द्या", असं मिश्किल वक्तव्य गुलाबराव पाटील यांनी कार्यकर्त्यांशी बोलताना केलं."मी तुमच्यावर बारीक लक्ष ठेवतो. माझ्या निवडणुकीमध्येही तुम्हाला बारीक लक्ष ठेवावं लागेल. हे आपलं कुटुंब आहे आणि आपल्या कुटुंबामध्ये खऱ्या गोष्टी सांगितल्या पाहिजेत. आपल्याला खूप मेहनत घ्यावी लागणार आहे. सर्वांना हात जोडून विनंती आहे की, आपली कामं सुरुच राहणार आहेत. मी सांगितल्या प्रमाणे पाच वर्षात १ हजार ८२५ दिवसही मी तुम्हाला देतो. त्यामुळे मला खात्री आहे की मी म्हणजे तुम्ही आहात आणि तुम्ही म्हणजे मी आहे. आपलं शरीर वेगवेगळं असलं तरी आपला आत्मा एकच आहे, असं मानणारा मी कार्यकर्ता आहे", असं गुलाबराव पाटील कार्यकर्त्यांशी बोलताना म्हणाले.

"मला खात्री आहे की, निवडणुकीच्या वेळेस वेगवेगळे प्रचार होतील. आताही आपल्याबाबत वेगळे प्रचार होत आहेत. भारतीय जनता पक्ष वेगळी निवडणूक लढवणार, मग आपल्या त्रास होणार, असे प्रचार होत आहेत. मात्र, असं काहीही होणार नाही. वरती पॅंचअप पक्क आहे. भारतीय जनता पक्ष, शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी अजित पवार गट अशी युती पक्की आहे. त्यामुळे त्याची चिंता करण्याची आपल्याला गरज नाही. आपले दाढीवाले बाबा वरती बसलेत, त्यामुळे तुम्ही या दाढीवाल्या बाबाकडे लक्ष द्या, वरती आपले दाढीवाले बाबा आपलं सगळं काम बरोबर करतात", असं मिश्किल वक्तव्य गुलाबराव पाटील यांनी केलं.महायुती आणि महाविकास आघाडीत असणाऱ्या पक्षांमध्ये विधानसभेच्या जागावाटपाबाबतही सध्या खलबतं सुरु आहेत. अशातच निवडणुकीच्या आधी राजकीय नेत्यांमध्ये आरोप-प्रत्यारोपही पाहायला मिळत आहेत. आता शिवसेना शिंदे गटाचे नेते, मंत्री गुलाबराव पाटील यांनी कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात बोलताना केलेल्या एका वक्तव्याची चर्चा रंगली आहे. "दाढीवाले बाबा वरती बसलेत, तुम्ही या दाढीवाल्या बाबाकडे लक्ष द्या", असं मिश्किल वक्तव्य गुलाबराव पाटील यांनी कार्यकर्त्यांशी बोलताना केलं."मी तुमच्यावर बारीक लक्ष ठेवतो. माझ्या निवडणुकीमध्येही तुम्हाला बारीक लक्ष ठेवावं लागेल. हे आपलं कुटुंब आहे आणि आपल्या कुटुंबामध्ये खऱ्या गोष्टी सांगितल्या पाहिजेत. आपल्याला खूप मेहनत घ्यावी लागणार आहे. सर्वांना हात जोडून विनंती आहे की, आपली कामं सुरुच राहणार आहेत. मी सांगितल्या प्रमाणे पाच वर्षात १ हजार ८२५ दिवसही मी तुम्हाला देतो. त्यामुळे मला खात्री आहे की मी म्हणजे तुम्ही आहात आणि तुम्ही म्हणजे मी आहे. आपलं शरीर वेगवेगळं असलं तरी आपला आत्मा एकच आहे, असं मानणारा मी कार्यकर्ता आहे

### बाबा आपलं काम बरोबर करतात

आताही आपल्याबाबत वेगळे प्रचार होत आहेत. भारतीय जनता पक्ष वेगळी निवडणूक लढवणार, मग आपल्या त्रास होणार, असे प्रचार होत आहेत. मात्र, असं काहीही होणार नाही. वरती पॅंचअप पक्क आहे. भारतीय जनता पक्ष, शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी अजित पवार गट अशी युती पक्की आहे. त्यामुळे त्याची चिंता करण्याची आपल्याला गरज नाही. आपले दाढीवाले बाबा वरती बसलेत, त्यामुळे तुम्ही या दाढीवाल्या बाबाकडे लक्ष द्या, वरती आपले दाढीवाले बाबा आपलं सगळं काम बरोबर करतात.

# मी तुमच्यासाठी खंबीर आहे : मनोज जरांगे

## मी शेवटच्या घटकेपर्यंत मराठा समाजाला सोडणार नाही

। मुंबई ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**राज्यात मराठा आणि ओबीसी आरक्षणाचा प्रश्न चांगलाच तापलेला आहे. मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देण्याची मागणी केलेली आहे. आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे यांनी अनेकदा उपोषणही केलं. मात्र, त्यांच्या या मागणीला ओबीसी समाजाने विरोध केला. तसेच याबाबत सर्वपक्षीय बैठकही बोलावण्यात आली होती.**



काहीही तोडगा निघालेला नाही. त्यामुळे सध्या मराठा आणि ओबीसी आरक्षणाच्या मुद्यांवरून नेत्यांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरु आहेत.अशातच आज मनोज जरांगे यांच्या वाढदिवसानिमित्त अंतरवाली सराटीमध्ये मराठा समाजाला संबोधित करत असताना मनोज जरांगे यांना अश्रू अनावर झाल्याचं पाहायला मिळालं. यावेळी बोलताना जरांगे म्हणाले, "मी तुमच्यासाठी खंबीर आहे. तुमचे पोरं मोठे करण्यासाठी मी जीव हातावर घेतला आहे. मी शेवटच्या घटकेपर्यंत मराठा समाजाला कधीही सोडणार नाही",तुमच्या मुलांना कधीच मोठं करणार नाही. मी तुम्हाला हे तळतळून सांगतो. तुम्ही फक्त जातीला बाप माना, नेत्यांना बाप मानायचं बंद करा. तुमचे मुलं तुम्हाला आयपीएस आणि आयएएस दर्जाचे अधिकारी पाहायचे असतील तर स्वत:चे मुलं मोठे करण्यासाठी लढायला लागा. त्यानंतर जगाच्या पाठीवर सर्वात श्रीमंत आणि प्रगतशील जात म्हणून फक्त मराठ्यांची जात असेल

### मी कुठेही फिरत असतो

"मी खंबीर आणि कणखर आहे. मी मागे हटत नाही. तुम्ही काळजी करु नका. मला फक्त उपोषणाच्या आणि शरीराच्या वेदना आहेत. बाकीच्या वेदनांना मी खंबीर आहे. माझी समाजाकडून काहीही अपेक्षा नाही. मला समाजाचा एक रुपयाही नको. फक्त समाजाचे पोरं मोठे करण्यासाठी मी जीव तळ हातावर घेतलेला आहे. संपूर्ण सरकार माझ्या मागे लागलंय. विरोधी पक्ष माझ्या मागे लागला आहे. पण मी मागे हटत नाही आणि हटणारही नाहीमी शेवटचं समाजाला सांगतो की, माझ्यावर सरकारने कधी हल्ला केला तर, कारण मी कुठेही फिरत असतो.

# वायनाडची परिस्थिती पाहून राहुल गांधी व्यथित!

## राहुल गांधी यांनी भूस्खलन झालेल्या परिसराची पाहणी केली

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**केरळमधील वायनाड येथे भूस्खलन होऊन आतापर्यंत तीनशेहून अधिक लोक मृत्युमुखी पडल्याचे समोर आले आहे. तर शेकडो लोक अजूनही बेपत्ता आहेत. केरळचे माजी खासदार राहुल गांधी आणि काँग्रेसच्या सरचिटणीस प्रियांका गांधी यांनी आज वायनाड येथील दुर्घटनाग्रस्त भागाचा दौरा केला. बाधित लोकांशी संवाद साधत त्यांना धीर देण्याचा प्रयत्न केला. यावेळी माध्यमांशी बोलत असताना राहुल गांधी भावुक झाल्याचे पाहायला मिळाले. त्यांनी म्हटले, "माझ्या वडिलांचा ज्यावेळेस मृत्यू झाला होता, त्यावेळी मला जे दुःख झाले, तेच दुःख आज होत आहे. मी तर वडील गमावले होते. पण वायनाडमध्ये काहींनी संपूर्ण कुटुंब गमावलं आहे. कुणाचा भाऊ, वडील, आई दगावली आहे."**



राहुल गांधी हे २०१९ आणि २०२४ साली वायनाड लोकसभा मतदारसंघातून निवडून आले होते. २०२४ साली त्यांनी रायबरेली आणि वायनाड या दोन्ही मतदारसंघातून निवडणूक लढविली होती. त्यामुळे वायनाडचा राजीनामा देऊन याठिकाणी प्रियांका गांधी निवडणूक लढवतील, अशी घोषणा काही महिन्यांपूर्वी काँग्रेसने केली होती. त्यामुळे आजच्या दौऱ्यात राहुल गांधी यांच्यासह प्रियांका गांधीही दिसून आल्या.राहुल गांधी यांनी आज वायनाड येथील भूस्खलन झालेल्या भागाचा दौरा केला. बाधित लोकांशी संवाद साधत त्यांचे सांत्वन केले. त्यानंतर माध्यमांशी केवळ एक मिनिट वार्तालाप करून ते निघून गेले. राहुल गांधी यांचे वडील राजीव गांधींची मे १९९१ मध्ये बॉम्बस्फोटात हत्या झाली होती. या प्रसंगाची आठवण करून देताना आजही त्याचप्रकारचे दुःख मला झाले आहे, असे ते म्हणाले."आम्ही वायनाडमधील लोकांच्या पाठीशी आहोत. मला अभिमान आहे की, आज संपूर्ण देश वायनाडच्या मदतीसाठी पुढे आला आहे", असेही राहुल गांधी म्हणाले. यावेळी त्यांना काही राजकीय प्रश्नही विचारण्यात आले. त्यावर बोलताना ते म्हणाले, आज राजकारणावर बोलण्याची परिस्थिती नाही. इथल्या लोकांना मदत हवी आहे. मी याक्षणाला राजकारण करू इच्छित नाही. माझे संपूर्ण लक्ष वायनाडच्या लोकांना मदत मिळवून देण्यावर आहे. यावेळी प्रियांका गांधींनीही लोकांशी संवाद साधला. काही काळानंतर वायनाडमध्ये लोकसभेसाठी पोटनिवडणूक होणार असून या निवडणुकीला त्या उभ्या राहणार आहेत. यावेळी माध्यमांशी बोलताना त्या म्हणाल्या, माझ्या भावाप्रमाणेच माझीही भावना आहे. मी एका मुलाला भेटले ज्याने आपल्या कुटुंबाला वाचविण्यासाठी सहा तास प्रयत्न केले. पण तो कुटुंबाला वाचवू शकला नाही. वायनाडच्या लोकांना मदत करण्यासाठी जे शक्य होईल, ते करण्याचा आमचा प्रयत्न आहे. हिमाचल प्रदेशमध्येही अशीच परिस्थिती ओढवली आहे. तिथेही मदत करण्याची गरज आहे.प्रियांका गांधी पुढे म्हणाल्या, कर्नाटकमध्ये आमची सत्ता आहे. तिथून आम्ही मदत पाठविण्याचा प्रयत्न करत आहोत.राहुल गांधी हे

### मी राजकारण करू इच्छित नाही

मी याक्षणाला राजकारण करू इच्छित नाही. माझे संपूर्ण लक्ष वायनाडच्या लोकांना मदत मिळवून देण्यावर आहे.यावेळी प्रियांका गांधींनीही लोकांशी संवाद साधला. काही काळानंतर वायनाडमध्ये लोकसभेसाठी पोटनिवडणूक होणार असून या निवडणुकीला त्या उभ्या राहणार आहेत. यावेळी माध्यमांशी बोलताना त्या म्हणाल्या, माझ्या भावाप्रमाणेच माझीही भावना आहे. मी एका मुलाला भेटले ज्याने आपल्या कुटुंबाला वाचविण्यासाठी सहा तास प्रयत्न केले. पण तो कुटुंबाला वाचवू शकला नाही. वायनाडच्या लोकांना मदत करण्यासाठी जे शक्य होईल, ते करण्याचा आमचा प्रयत्न आहे. हिमाचल प्रदेशमध्येही अशीच परिस्थिती ओढवली आहे. तिथेही मदत करण्याची गरज आहे.

२०१९ आणि २०२४ साली वायनाड लोकसभा मतदारसंघातून निवडून आले होते. २०२४ साली त्यांनी रायबरेली आणि वायनाड या दोन्ही मतदारसंघातून निवडणूक लढविली होती. त्यामुळे वायनाडचा राजीनामा देऊन याठिकाणी प्रियांका गांधी निवडणूक लढवतील, अशी घोषणा काही महिन्यांपूर्वी काँग्रेसने केली होती. त्यामुळे आजच्या दौऱ्यात राहुल गांधी यांच्यासह प्रियांका गांधीही दिसून आल्या.राहुल गांधी यांनी आज वायनाड येथील भूस्खलन झालेल्या भागाचा दौरा केला. बाधित लोकांशी संवाद साधत त्यांचे सांत्वन केले. त्यानंतर माध्यमांशी केवळ एक मिनिट वार्तालाप करून ते निघून गेले. राहुल गांधी यांचे वडील राजीव गांधींची मे १९९१ मध्ये बॉम्बस्फोटात हत्या झाली होती. या प्रसंगाची आठवण करून देताना आजही त्याचप्रकारचे दुःख मला झाले आहे, असे ते म्हणाले."आम्ही वायनाडमधील लोकांच्या पाठीशी आहोत. मला अभिमान आहे की, आज संपूर्ण देश वायनाडच्या मदतीसाठी पुढे आला आहे", असेही राहुल गांधी म्हणाले. यावेळी त्यांना काही राजकीय प्रश्नही विचारण्यात आले. त्यावर बोलताना ते म्हणाले, आज राजकारणावर बोलण्याची परिस्थिती नाही. इथल्या लोकांना मदत हवी आहे.

# मागे राहिलेल्या जात समूहांना न्याय मिळणार?

## अनुसूचित जाती-जमातीच्या आरक्षणात होणार वर्गीकरण

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अनुसूचित जाती आणि जमाती यांच्यातील काही जातींनी स्वतःची प्रगती साधली असली तरी या प्रवर्गातील अनेक जाती आजही मुख्य प्रवाहापासून दूर आहेत, त्यामुळे या जातींना आरक्षणाअंतर्गत काही जागा राखीव ठेवण्यात याव्यात अशी जुनी मागणी आहे.**




२००४ साली हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात पोहोचले असताना न्यायालयाने अनुसूचित जाती आणि जमातीच्या आरक्षणात विभागणी करण्यास नकार दिला होता. मात्र आज सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील सात न्यायाधीशांच्या खंडपीठाने अनुसूचित जाती आणि जमातीच्या आरक्षणात राखीव जागा ठेवण्यास मंजूरी दिली आहे. तसेच या राखीव जागा समानतेच्या तत्त्वाच्या विरोधात नाही, असेही न्यायालयाने नमूद केले. सर्वोच्च न्यायालयाच्या सात न्यायाधीशाच्या खंडपीठाने ६:१ या बहुमताने निर्णय दिला. न्यायाधीश बेला माधुर्य त्रिवेदी यांनी या निर्णयाला असहमती दर्शविली. या माध्यमातून सर्वोच्च न्यायालयाने २००४ सालच्या ई. व्ही. चिन्नय्या वि. आंध्र प्रदेश राज्य या खटल्यात दिलेला आपलाच निकाल बदलला. या खटल्यात

### समाजावर अन्याय होता कामा नये

मातंग समाजाकडून ही मागणी आक्रमकपणे आजवर मांडण्यात आलेली आहे. यासाठी या समाजाकडून अनेकदा आंदोलनेही झाली आहेत. आरक्षणाचा फायदा त्या त्या प्रवर्गातील काही निवडक जातींना झाला, मात्र इतर जाती उपेक्षित राहिल्या, असा मुद्दा सामाजिक कार्यकर्तेही वारंवार मांडत आले आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची आता राज्य सरकार कशाप्रकारे अंमलबजावणी करते, हे पुढील काळात कळेल.आरक्षणामधील वर्गीकरण हे आकडेवारीवर आधारित असले पाहीजे, यातून कोणत्याही समाजावर अन्याय होता कामा नये.

अनुसूचित जातीच्या आरक्षणात वर्गीकरण करता येणार नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते. आज हा निकाल वाचत असताना सरन्यायाधीश चंद्रचूड म्हणाले, "ऐतिहासिक आणि अनुभवजन्य पुरावे असे सूचित करतात की, अनुसूचित जाती हा एकसंध वर्ग नाही."देशभरातील काही राज्यांसह महाराष्ट्रातही अनुसूचित जाती आणि जमातीच्या आरक्षणात वर्गीकरण करण्यात यावे.

# शाहरुख खानच्या जबरदस्त लूकने वेधलं लक्ष

गेल्या काही दिवसांपासून बॉलीवूडचा बादशाह अर्थात शाहरुख खानच्या डोळ्यांच्या शस्त्रक्रियेविषयी वृत्त समोर येत आहेत. शाहरुख डोळ्यांच्या शस्त्रक्रियेसाठी अमेरिकेला जाणार असल्याचं म्हटलं जात आहे. अशातच शाहरुख खान काल प्रसिद्ध दिग्दर्शक सिद्धार्थ आनंदच्या वाढदिवसाच्या पार्टीत दिसला. यावेळी अभिनेत्याच्या जबरदस्त लूकने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं. त्यामुळेच सिद्धार्थ आनंदच्या वाढदिवसाच्या पार्टीतील शाहरुखचे व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाले आहेत.'सलाम नमस्ते', 'बचना ऐ हसीनों', 'बँग बँग' आणि 'वॉर' यांसारख्या अनेक चित्रपटाची निर्माती, दिग्दर्शन सिद्धार्थ आनंद केलं आहे. गेल्या वर्षी त्याने शाहरुख खानबरोबर ( SHAH RUKH KHAN ) ॲक्शन-थ्रिलर 'पठाण' चित्रपट केला. बॉक्स ऑफिसवर बक्कळ कमाई करणाऱ्या 'पठाण' चित्रपटाचं दिग्दर्शन सिद्धार्थ आनंदने केलं होतं. काल, ३१ जुलैला सिद्धार्थने ४६वा वाढदिवस साजरा केला. या वाढदिवसासाठी खास शाहरुख खानने उपस्थित लावली होती.मुंबईत वांद्रे येथे सिद्धार्थ आनंदची वाढदिवसाची पार्टी आयोजित करण्यात आली होती. या पार्टीला बॉलीवूडचे अनेक सेलिब्रिटी हजर होते. पण पार्टीतील शाहरुख खानच्या जबरदस्त लूकने सगळ्यांचं लक्ष वेधून घेतलं. शाहरुखचा व्हिडीओ 'इन्स्टंट बॉलीवूड' या इन्स्टाग्राम पेजवर शेअर करण्यात आला आहे. ज्यामध्ये अभिनेता आलिशान गाडीत बसताना दिसत आहे. यावेळी बादशाह ब्लॅक टी-शर्ट, डेनिम जॅकेट आणि ग्रे रंगाच्या कार्गो पँटमध्ये पाहायला मिळत आहे.

# दिशाच्या बहिणीने शेअर केले लष्करी गणवेशातील फोटो

आपल्या फॅशन व बोल्डनेसमुळे लोकप्रिय असलेली अभिनेत्री दिशा पाटनी (DISHA PATANI) हिला खुशबू नावाची मोठी बहीण आहे. दिशा फॅशनच्या दुनियेत सक्रिय आहे, तर तिची बहीण खुशबू पाटनी ही भारतीय सैन्यात अधिकारी राहिली आहे. स्वातंत्र्यदिन अवघ्या दोन आठवड्यांवर आहे, अशातच खुशबूने तिचे काही जुने फोटो शेअर केले आहेत. भारतीय सैन्यात लेफ्टनंट राहिलेली खुशबू आता न्यूट्रिशनिस्ट, फिटनेस ट्रेनर व टॅरो कार्ड रीडर आहे. ती इन्स्टाग्रामवर लोकांना फिटने टिप्स देते. याशिवाय ती उत्तम डान्सही करते. खुशबू सोशल मीडियावर खूप सक्रिय आहे. तिचे इन्स्टाग्रामवर जवळपास सात लाख फॉलोअर्स आहेत. खुशबू दिसायला बहीण दिशासारखीच सुंदर आहे.खुशबूने तिच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर १० फोटो शेअर केले आहेत. हे सर्व फोटो ती भारतीय सैन्यात होती तेव्हाचे आहेत. तिने या फोटोंना भावनिक कॅप्शन दिलं आहे. "ऑगस्ट महिना आल्यावर माझ्या हृदयाची धडधड जास्त वाढते. माझे डोळे नेहमीच माझे माझ्या देशावर असलेले प्रेम दर्शवतात. का, ते तुम्हाला माहितीये का? कारण आम्ही आतापासूनच स्वातंत्र्य दिन साजरा करण्यास सुरुवात केली आहे! माझ्या सर्व महिला अधिकाऱ्यांना खूप खूप प्रेम," असं खुशबूने कॅप्शनमध्ये लिहिलं आहे.खुशबूने ती सैन्यात असतानाचे काही फोटो शेअर केले आहेत. यातील काही फोटो वसतीगृहातील आहेत, तर काही ट्रेनिंगचे आहेत. काही फोटोंमध्ये खुशबू लष्करी गणवेशात दिसत आहे. तिचे हे फोटो पाहून चाहते लाइक्स व कमेंट्सचा वर्षाव करत आहेत. 'सैन्यात येण्यासाठी इच्छुक उमेदवारांसाठी हे फोटो खूप प्रेरणादायी आहेत,' अशी कमेंट एका युजरने केली आहे.'तरुण पिढीसाठी खरी प्रेरणा,' 'किती सुंदर प्रवास! हे फोटो पाहून मी थोडी भावुक झाले, पण त्याचबरोबर आम्हाला तुझा अभिमान वाटतो,' 'तुमच्या सारख्या धाडसी मुलींची आपल्या देशाला गरज आहे,' 'तुझ्याकडे सर्वकाही असूनही तू देशभक्तीचा मार्ग निवडलास. आम्हाला तुझा अभिमान आहे,' अशा कमेंट या फोटोंवर चाहत्यांनी केल्या आहेत.



# डाव्यांची लायकी काय आहे

बॉलीवूड अभिनेते व लेखक पीयूष मिश्रा यांनी नुकत्याच प्रदर्शित झालेल्या 'जेएनयू' (जहांगीर नॅशनल युनिव्हर्सिटी) सिनेमात काम केल्याबद्दल बिनशर्त माफी मागितली आहे. 'जेएनयू' हा एक वादग्रस्त चित्रपट होता, हा प्रोपगंडा सिनेमा असल्याची टीकाही समीक्षकांनी केली होती. कम्युनिस्ट लोकांबद्दल द्वेष असल्यामुळे संपूर्ण स्क्रिप्ट न वाचता ही भूमिका स्वीकारण्याचं मिश्रा यांनी सांगितलं. हा चित्रपट करणे ही चूक होती, असंही त्यांनी म्हटलं आहे.'दैनिक जागरण'ला दिलेल्या मुलाखतीत पीयूष मिश्रा यांना त्यांच्या कम्युनिस्ट भूतकाळाबद्दल विचारण्यात आलं. "त्यावेळी मला त्यापेक्षा चांगलं काही माहीत नव्हतं. मी तेव्हाही कम्युनिस्ट विचारसरणीचं समर्थन करत नव्हतो, पण त्याकाळी माझ्याकडे स्वतःचे कोणतेही व्यक्तिमत्व नव्हते, त्यामुळे आजूबाजूच्या लोकांचे अनुसरण करण्याशिवाय पर्याय नव्हता," असं ते म्हणाले.



# आमिरला आलेले मुलाचे टेन्शन!

बॉलीवूडचा मिस्टर परफेक्शनिस्ट म्हणून ओळखला जाणारा अभिनेता म्हणजे आमिर खान होय. तो सतत कोणत्या ना कोणत्या कारणामुळे चर्चेत असतो. गेल्या काही दिवसांपासून अभिनेता मुलगा जुनैद खानमुळे मोठ्या चर्चेत होता. जुनैद खानने नुकतेच 'महाराज' या चित्रपटातून पदार्पण केले आहे. आता आमिर खानने एका मुलाखतीत, जुनैदच्या पदार्पणाबाबत खूप तणावात होतो, असे वक्तव्य केले आहे.'न्यूज १८' बरोबर संवाद साधताना आमिर खानने जुनैदच्या पदार्पणाबाबत वक्तव्य केले आहे. तो म्हणतो की, जेव्हा जुनैद बॉलीवूडमध्ये पदार्पण करत होता. त्यावेळी मी खूप तणावात होतो. लोकांना त्याचे काम आवडेल की नाही, माहित नव्हते. पण त्याने स्वत:वर खूप मेहनत घेतली आहे. त्याने कधीच माझ्याकडून कसलीच मदत घेतली नाही. मला खूप गर्व वाटतो आणि आनंद होतो की, सगळ्या गोष्टी त्याने स्वत:च्या मेहनतीवर केल्या, सगळ्यांना ते माहित आहे. आणखी एका मुलाखतीत आमिरने जुनैदचे कौतुक करताना म्हटले आहे की, त्याने सुरुवातीलाच वेगळे कथानक निवडले, लोकांना त्याची भूमिका आवडली. लोक ज्याप्रकारे त्याला पाठिंबा देत आहेत, ही खरंच चांगली सुरुवात आहे. त्याने माझ्याशिवाय सगळ्या गोष्टी केल्या आहेत. हा चित्रपट मिळवण्यासाठीदेखील त्याने स्क्रीन टेस्ट दिली आहे. जुनैद खानने काही दिवसांपूर्वी सिद्धार्थ कननला दिलेल्या मुलाखतीत आपल्या कुटुंबाविषयी भाष्य केले होते.

# लाडक्या लेकीसह मुंबईत परतली ऐश्वर्या राय-बच्चन

गेल्या काही दिवसांपासून ऐश्वर्या राय-बच्चन खूप चर्चेत आली आहे. अनंत अंबानी व राधिका मर्चंटच्या लग्नसोहळ्याला बच्चन कुटुंबियांबरोबर ऐश्वर्या उपस्थितीत राहिली नव्हती. लाडकी लेक आराध्याबरोबर ऐश्वर्या अनंत-राधिकाच्या लग्नाला पोहोचली होती. तेव्हापासून ऐश्वर्या राय-बच्चन आणि अभिषेक बच्चन यांच्यातील घटस्फोटाच्या चर्चांना उधाण आलं आहे. अशातच ऐश्वर्या राय-बच्चन लेक आराध्याबरोबर अमेरिकेत सुट्टी एन्जॉय करण्यासाठी गेली होती. अमेरिकेतील ऐश्वर्याचे बरेच फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. त्यानंतर आता ऐश्वर्या लेकीसह अमेरिकेहून सुट्टी एन्जॉय करून मुंबईत परतली आहे. यासंबंधित ऐश्वर्या व आराध्याचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे.सेलिब्रिटी फोटोग्राफर 'विरल भयानी'च्या इन्स्टाग्राम पेजवर ऐश्वर्या राय-बच्चन ) आणि आराध्या बच्चन यांचा मुंबई विमानतळावरील व्हिडीओ शेअर करण्यात आला आहे. या व्हिडीओत, ऐश्वर्या काळ्या रंगाच्या आऊटफिटमध्ये दिसत असून आराध्या फिकट जांभळ्या रंगाचा टॉप आणि काळ्या पॅन्टवर पाहायला मिळत आहे. नेहमीप्रमाणे ऐश्वर्या लेकीची काळजी घेत तिला गाडीत बसवताना दिसत आहे. एवढंच नव्हे तर यावेळी ऐश्वर्याने पापाराझींशी संवाद साधला. त्यांना गुड मॉर्निंग म्हणाली. ऐश्वर्या व आराध्याचा हा मुंबई विमानतळावरील व्हिडीओ सध्या चांगलाच चर्चेत आला आहे. नेटकऱ्यांनी व्हिडीओवर भरभरून प्रतिक्रिया दिल्या आहेत. काही नेटकऱ्यांनी ऐश्वर्या व आराध्याच्या लूकविषयी प्रतिक्रिया दिली आहे. "आराध्या अभिषेक बच्चन सारखी हुबेहूब दिसते", असं म्हणतं आहेत. तसंच काही नेटकऱ्यांनी "आराध्या शाळेत जात नाही का? अभ्यास करते की नाही?" असे सवाल उपस्थित केले आहेत.दरम्यान, गेल्या बऱ्याच दिवसांपासून ऐश्वर्या व अभिषेकच्या नात्यात दुरावा निर्माण झाल्याच्या चर्चा रंगल्या आहेत. इन्स्टाग्रामवर ऐश्वर्या फक्त अभिषेकलाच फॉलो करते. बच्चन कुटुंबातील कोणत्याही सदस्याला फॉलो करत नाही.

# पी.व्ही.सिंधूला पराभवाचा धक्का!

## » पदकांची हॅट्ट्रिक हुकली; जियाओने घेतला बदला

नवी दिल्ली । ।वृत्तसंस्था

**भारताची शटलर पी.व्ही. सिंधूला मोठा धक्का बसला आहे. गुरुवारी चीनच्या हि बिंग जिओने टोकियो ऑलिम्पिकमधील पराभवाचा बदला २-० ने घेतला. त्यामुळे पी.व्ही. सिंधूची ऑलिम्पिक पदकाची हॅट्रिक हुकली आहे. जागतिक क्रमवारीत सहाव्या क्रमांकावर असलेली चीनची हि बिंग जियाओने महिला एकेरीच्या प्री-क्वार्टर फायनलमध्ये सरळ गेममध्ये विजय मिळवत उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली. २९ वर्षीय सिंधू सातत्यपूर्ण कामगिरी करण्यात अपयशी ठरली आणि ५६ मिनिटे चाललेल्या राऊंड ऑफ १६ सामन्यात तिला बिंग जियाओने २१-१९, २१-१४ अशा फरकाने पराभूत केले. भारताला तिच्याकडून इतर खेळाडूंच्या तुलनेत सर्वात जास्त पदकाची आशा होती. मात्र, पी.व्ही.सिंधूने देशवासियांची निराशा केली.**

तत्पूर्वी रिओ दी जानेरो आणि टोकियो ऑलिम्पिकमध्ये रौप्य आणि कांस्यपदक जिंकणाऱ्या सिंधूने गटात अव्वल स्थान पटकावत बाद फेरीसाठी पात्रता मिळवली होती. मात्र, आज सिंधूला पराभव पत्करावा लागला. याआधी पी.व्ही. सिंधूने रिओ ऑलिम्पिक २०१६ मध्ये रौप्य पदक आणि टोकियो ऑलिम्पिक २०२० मध्ये कांस्य पदक जिंकले होते. त्यामुळे पॅरिस ऑलिम्पिकमध्येही भारताला तिसऱ्या पदकाची आशा होती. मात्र, ती असे करण्यात अपयशी ठरली. जर सिंधू हे करण्यात यशस्वी ठरली असती, तर ती तीन ऑलिम्पिक पदके जिंकणारी भारताच्या इतिहासातील पहिली खेळाडू ठरली असती.या सामन्यात सिंधूची सुरुवात चांगली झाली नाही. बिंग जियाओने काही अचूक स्मॅश मारताना तिने काही चुका केल्या, ज्यामुळे चिनी खेळाडूने ५-१ अशी आघाडी घेतली. सिंधूला कोर्टवर हालचाल करण्यात अडचण येत होती आणि बाहेर काही फटके मारून तिने चीनच्या खेळाडूला ७-२ अशी



आघाडी घेण्याची संधी दिली. यानंतर भारतीय खेळाडूने काही चांगले गुण मिळवून पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला पण ब्रेकपर्यंत बिंग जियाओने ११-८ ने आघाडी घेतली. यानंतर सिंधूने चीनच्या खेळाडूवर दबाव आणला. तीन अगदी जवळचे गुण तिच्या बाजूने गेल्यामुळे तिला फायदा झाला. त्यामुळे सिंधूने गुणसंख्या १२-१२ करत बरोबरी साधली. चीनच्या खेळाडूने दबावाखाली काही चुकाही केल्या पण त्यानंतर सलग तीन गुण घेत १७-१४ अशी आघाडी घेतली. सिंधूच्या अंगावर स्मॅश मारत बिंग जियाओने १९-१७ अशी आघाडी घेतली. यानंतर भारतीय खेळाडूने सलग दोन गुण घेत गुणसंख्या १९-१९ अशी केली. चीनच्या खेळाडूने लाईनवर शॉट मारून गेम पॉइंट मिळवला आणि नंतर दीर्घ रॅलीनंतर क्रॉस कोर्टवर ३० मिनिटांत २१-१९ असा पहिला गेम जिंकला. दुसऱ्या गेममध्येही बिंग जियाओने सिंधूला तिच्या स्मॅशसह अडचणीत आणले आणि सलग सहा गुणांसह ८-२ अशी आघाडी घेतली.तत्पूर्वी रिओ दी जानेरो आणि टोकियो ऑलिम्पिकमध्ये रौप्य आणि कांस्यपदक जिंकणाऱ्या सिंधूने गटात अव्वल स्थान पटकावत बाद फेरीसाठी पात्रता मिळवली होती. याआधी पी.व्ही. सिंधूने रिओ ऑलिम्पिक २०१६ मध्ये रौप्य पदक आणि टोकियो ऑलिम्पिक २०२० मध्ये कांस्य पदक जिंकले होते. त्यामुळे पॅरिस ऑलिम्पिकमध्येही भारताला तिसऱ्या पदकाची आशा होती. मात्र, ती असे करण्यात अपयशी ठरली.

### इतिहास रचण्याची संधी गमावली

जर सिंधू हे करण्यात यशस्वी ठरली असती, तर ती तीन ऑलिम्पिक पदके जिंकणारी भारताच्या इतिहासातील पहिली खेळाडू ठरली असती. या सामन्यात सिंधूची सुरुवात चांगली झाली नाही. बिंग जियाओने काही अचूक स्मॅश मारताना तिने काही चुका केल्या, ज्यामुळे चिनी खेळाडूने ५-१ अशी आघाडी घेतली. सिंधूला कोर्टवर हालचाल करण्यात अडचण येत होती आणि बाहेर काही फटके मारून तिने चीनच्या खेळाडूला ७-२ अशी आघाडी घेण्याची संधी दिली. यानंतर भारतीय खेळाडूने काही चांगले गुण मिळवून पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला पण ब्रेकपर्यंत बिंग जियाओने ११-८ ने आघाडी घेतली. यानंतर सिंधूने चीनच्या खेळाडूवर दबाव आणला. तीन अगदी जवळचे गुण तिच्या बाजूने गेल्यामुळे तिला फायदा झाला. त्यामुळे सिंधूने गुणसंख्या १२-१२ करत बरोबरी साधली.चीनच्या खेळाडूने दबावाखाली काही चुकाही केल्या पण त्यानंतर सलग तीन गुण घेत १७-१४ अशी आघाडी घेतली.

---

# स्वप्नील कुसाळेने ऑलिम्पिकमध्ये पटकावलं कांस्य पदक

## » मुख्यमंत्री शिंदेंनी एक कोटीचं पारितोषिक केलं जाहीर

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारताच्या स्वप्नील कुसाळेने आश्चर्यकारक कामगिरी करत पॅरिस ऑलिम्पिकमध्ये इतिहास रचला आहे. त्याने नेमबाजीत ५० मीटर रायफल स्पर्धेत थ्री पोझिशनमध्ये कांस्यपदक पटकावले. स्वप्नीलने ५० मीटर रायफल स्पर्धेत चमकदार कामगिरी केली. त्याचा एकूण स्कोर ४५१.४ होता. तो खाशाबा जाधव यांच्यानंतर ऑलिम्पिकमध्ये वैयक्तिक पदक जिंकणारा महाराष्ट्राचा दुसरा खेळाडू ठरला आहे. पॅरिस ऑलिम्पिक २०२४ मध्ये भारताने एकूण तीन पदके जिंकली आहेत. तिन्ही पदके नेमबाजीत आली आहेत.**





मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ऑलिंपिकवीर स्वप्नील कुसाळेला एक कोटी रुपयांचे पारितोषिक जाहीर केलं आहे. याबाबत बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, "शाब्बास स्वप्नील, तुझ्या कांस्य पदकामुळे महाराष्ट्राच्या चेहऱ्यावर हास्य पसरलं.

तुझी कामगिरी महाराष्ट्रासाठी अभिमानास्पद आहे. तू आमचा अभिमान आहेस", अशा शब्दांत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वप्नील कुसाळेचं अभिनंदन केलं. तसेच या कामगिरीसाठी स्वप्नीलला एक कोटी रुपयांचे पारितोषिक दिले जाईल, असं जाहीर केलं."स्वप्नीलचे रौप्य पदक अवघ्या ०.१ गुणांनी हुकले आहे. तरीही त्याने कांस्य पदक पटकावल्याने महाराष्ट्राच्या चेहऱ्यावर हास्य फुलले आहे. महाराष्ट्राला वैयक्तिक कामगिरीसाठी ७२ वर्षांनी पदक मिळाले आहे. या कामगिरीसाठी स्वप्नीलला एक कोटी रुपयांचे पारितोषिक दिले जाईल. त्याचा आणि त्याचे प्रशिक्षक, आई-वडील यांचा यथोचित सत्कारही केला जाईल.

### मुख्यमंत्री शिंदे काय म्हणाले?

स्वप्नीलला नेमबाजीतील पुढील तयारीसाठी आवश्यक, त्या सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील. स्वप्नीलने आपल्या कामगिरीने इतिहास रचला आहे. या यशासाठी कुसाळे कुटुंबियांसह, त्याला मार्गदर्शन करणारे, प्रशिक्षक आदींची मेहनत महत्वाची ठरली आहे.उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, "महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनचा अध्यक्ष म्हणून नेमबाजी स्वप्नीलचे हे यश आनंददायी आहे. स्वप्नीलचा महाराष्ट्राला अभिमान आहे. नेमबाजीतील या क्रीडा प्रकारात पदक पटकावणारा स्वप्नील एकमेव भारतीय खेळाडू ठरला आहे. आपण राज्यातील विविध क्रीडा प्रकारांसाठी खेळाडू, प्रशिक्षक यांच्यासाठी आवश्यक त्या सर्व सोयी, पायाभूत सुविधा उपलब्ध करून देत आहोत. राज्यातील क्रीडा संकुलांच्या सुविधांचाही विस्तार करत आहोत. ऑलिंपिकहून परतल्यानंतर स्वप्नीलचे महाराष्ट्रात स्वागत आणि यथोचित सत्कार केला जाईल", असेही त्यांनी सांगितले.